# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४.


क्र.कोविमं/ए-२/गोप./प्रात्य./4473
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक: ०६/०३/२०२३.

प्रति,

प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविदयालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय:-उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०२३ च्या तोंडी / अंतर्गत व प्रात्यक्षिक परीक्षेच्या आऊट ऑफ टर्न तारखांबाबत...**

उपरोक्त विषयांस अनुसरुन सर्व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२३ च्या शास्त्र, तंत्र, व्यावसायिक तसेच किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा, भाषा व इतर विषयांच्या तोंडी परीक्षा व श्रेणी परीक्षा **दिनांक ०१/०२/२०२३ ते २०/०२/२०२३** या कालावधीत आयोजित करण्यात आल्या आहेत.

ज्या विद्यार्थ्यांची शास्त्र, तंत्र व्यावसायिक तसेच किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षा व इतर विषयांच्या तोंडी परीक्षा उपरोक्त नियमित कालावधीमध्ये होऊ शकली नाही, अशा विद्यार्थ्यांची **शास्त्र, भाषा व इतर विषयांच्या तोंडी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा आऊट ऑफ टर्न ने दिनांक २३/०३/२०२३ ते २५/०३/२०२३ या कालावधीत आयोजित केली आहे.** त्यापैकी शास्त्र विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा खालील जिल्हयातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये घेण्यात येणार आहेत.

| अ.क्र | जिल्हा | कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव |
|---|---|---|
| १. | सातारा | यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, सातारा. |
| २. | सांगली | विलिंग्डन कॉलेज, सांगली. |
| ३. | कोल्हापूर | गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज, कोल्हापूर. |

**आऊट ऑफ टर्न** प्रात्यक्षिक परीक्षेसाठी अंतर्गत / बहिस्थ परीक्षकांची नेमणूक ही दिनांक ०१/०२/२०२३ ते २०/०२/२०२३ या कालावधीसाठी नेमलेल्या परीक्षकांचीच करण्यात यावी व विद्यार्थी संख्येचा अंदाज घेवूनच अंतर्गत / बहिस्थ परीक्षक यांची नियुक्ती करुन निर्धारित वेळेत परीक्षेचे काम पूर्ण करावे.

**शास्त्र विषयाशिवाय** अन्य विषयांची **आऊट ऑफ टर्न** व्यावसायिक विषय/ प्रात्यक्षिक परीक्षा भाषा व इतर विषयांच्या तोंडी परीक्षा आपल्याच कनिष्ठ महाविद्यालयामध्ये **दिनांक २३/०३/२०२३ ते २५/०३/२०२३** या कालावधीत आयोजित करावी.

बहिष्कार आंदोलनामुळे वरिष्ठ महाविद्यालयास संलग्न असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयातील सर्वच विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा घेणे शक्य झाले नसल्यास अशा विद्यार्थ्यांची परीक्षा आऊट ऑफ टर्नच्या कालावधीमध्ये घेण्यात यावी. **सदर आऊट ऑफ टर्न परीक्षेसाठी अनुज्ञेय असलेले शुल्क / दंड आकारू नये. कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.**

सदरची आऊट ऑफ टर्न परीक्षा पूर्ण झाल्यानंतर संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षोत्तर गोपनीय साहित्य सिलबंद करुन **सोमवार दिनांक २७/०३/२०२३** रोजी आपल्या प्रतिनिधीमार्फत मंडळ कार्यालयात हस्तपोहोच देण्यात यावे. प्रात्यक्षिक परीक्षेच्या गुणपत्रिका कोणत्याही परिस्थितीत पोस्टाने पाठवू नयेत.

(डी.एस.पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

**महत्वाची टिप:-** **पर्यावरण विषयासह ज्या विषयांसाठी प्रकल्प अहवाल व जर्नल / सेमिनार नुसार गुण दिले जातात अशा विषयासाठी आऊट ऑफ टर्नने परीक्षा घेता येणार नाही याची नोंद घ्यावी.**